दैनिक दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
divyamarathi.com एकूण पाने १२+८+४=२४। किंमत ₹ ३.५० औरंगाबाद बुधवार, २३ मार्च २०१६

**आर्थिक पाहणी** | लालफीत शाहीमुळे महाराष्ट्रातील व्यावसायिक संकटात, रोजगार घटल्याचेही उघड

# लघु मध्यम उद्योग गुंतवणूक चार हजार कोटींनी घटली

संतोष काळे | मुंबई

मेक इन इंडिया कार्यक्रमात ७ लाख ९४ हजार कोटी रुपयांचे परस्पर सामंजस्य कराराच्या माध्यमातून राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्याचा डंका राज्य सरकार वाजवत आहे. पण दुसऱ्या बाजूला लघु आणि मध्यम उद्योगातील गुंतवणुक मात्र सुमारे चार हजार कोटी रुपयांनी घटल्याने सरकारच्या कार्यक्षमतेवरच प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. परदेशातील कंपन्यांसाठी लाल गालिचे तर देशातील लघु-मध्यम उद्योगांसाठी मात्र लालफीत शाही अशा सरकारच्या धोरणामुळे ही वेळ आल्याचा आरोप या क्षेत्रातील व्यावसायिकांच्या संघटनेने केला आहे.

राज्याच्या औद्योगिक विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या या क्षेत्रात २०१४-१५ वर्षात ७ हजार १८० हजार कोटी रुपयांची झालेली गुंतवणूक तब्बल ३ हजार ९० हजार कोटी रुपयांनी घटून ती ४ हजार ९० कोटी रुपयांवर आली आहे. केवळ गुंतवणूकच नाही तर रोजगारचे प्रमाण देखील गेल्या वर्षातल्या ३ लाख ५० हजारावरून घटून १ लाख ६६ हजारावर आले आहे. महाराष्ट्राकडे 'इन्व्हेस्टमेंट डेस्टिनेशन' म्हणून बघितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र चित्र विदारक आहे. अशा परिस्थितीत दोन अंकी वाढ कशी साध्य करणार असा प्रश्न उद्योग वर्तुळात व्यक्त केला आहे. राज्याच्या आर्थिक पाहणीत उद्योगांच्या चौथ्या गणनेनुसार (२००६-०७) ३१ मार्च २००७ मध्ये राज्यात एकूण ८६, ६३५ उद्योग कार्यरत होते.

## लघु-मध्यम उद्योगाकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष

### रोजगारात घट

केंद्राने महाराष्ट्राला यंदा २८ हजार रोजगार निर्मितीची जबाबदारी होती. त्यापैकी केवळ २६ हजार रोजगार निर्मिती होऊ शकली. उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये सरकार कमी पडले असून औद्योगिक स्थिती खालावली असल्याचेच हे द्योतक असल्याचे चंद्रकांत साळुंखे यांनी सांगितले.

### नऊ वर्षातील लघु व मध्यम उद्योगातील गुंतवणूक व रोजगाराचा कल

| वर्ष | गुंतवणूक | रोजगार |
|---|---|---|
| २००७-०८ | २,२८१ कोटी रु. | १.३९ लाख |
| २००८-०९ | ३,२९५ कोटी रु. | १.७१ लाख |
| २००९- १० | ३,०२८ कोटी रु. | १.५० लाख |
| २०१०- ११ | ५,५६३ कोटी रु. | १.७ लाख |
| २०११- १२ | ४,४४३ कोटी रु. | २.०७ लाख |
| २०१२- १३ | ६,३५८ कोटी रु. | २.०६ लाख |
| २०१३-१४ | ६,३५८ कोटी रु. | २.४८ लाख |
| २०१४-१५ | ७,१८० कोटी रु. | ३.५० लाख |
| २०१५-१६ | ४,०९० लाख रु. | १.६६ लाख |



### एसएमई उद्योगातील रोजगार निर्मिती

| | |
|---|---|
| मुंबई | ४.०५ लाख |
| कोकण (मुंबई वगळून ) | ६.३२ लाख |
| नाशिक | ३.१५ लाख |
| पुणे | १०.०५ लाख |
| औरंगाबाद | १.९३ लाख |
| अमरावती | १.१४ लाख |
| नागपूर | २.५५ लाख |
| एकूण | २९.१९ लाख |